परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Phone: (020) 2562 1398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा/अभि./ 407 दिनांक: 07 / 03 /२०२५

प्रति
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा)

**विषय : अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत....**

संदर्भ : १. परिपत्रक क्र. ३८/२०२५ (जा.क्र.सीबी/३४, दिनांक २२/०२/२०२५)
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/अभि./३६४, दिनांक २८/०२/२०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय परिपत्रकान्वये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना एप्रिल/मे २०२५ परीक्षेसाठी पुढील वर्गामध्ये (कॅरी ऑन) सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

एप्रिल/मे २०२५ परीक्षेतील कॅरी ऑन सुविधेतंर्गत ज्या विद्यार्थ्यांचे पाचव्या आणि सातव्या सत्राचे अंतर्गत परीक्षेतील Insem, Oral, Practical, TW and Audit Course हे विषय विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावर नियोजन लेखी परीक्षेपूर्वी/परीक्षेनंतर करण्यात यावे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये वरीलप्रमाणे पुढील वर्गात प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेश देण्यात आलेला असून हिवाळी २०२४ मध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले नव्हते परंतु प्रथम वर्ष ऑक्टोबर, २०२४ आणि द्वितीय वर्ष ऑक्टोबर २०२४ या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेला असून ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित परीक्षेच्या Photocopy आणि Revaluation साठी अर्ज केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांचा Photocopy आणि Revaluation नंतर निकालात बदल झाल्यास, अशा पात्र विद्यार्थ्यांना देखील कॅरी ऑनची सुविधा नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याबाबत महाविद्यालयाने निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यापीठ परीक्षा विभागाशी अति तात्काळ संपर्क साधावा.

खालील तक्त्यानुसार विद्यार्थी पात्र राहतील:

**1) FE To TE**

| प्रथम वर्ष (FE) | व्दितीय वर्ष (SE) | तृतीय वर्ष (TE) |
|---|---|---|
| Passed in OCT-2024 | Minimum 50% Credits in APRIL-2024 | Eligible to Carry on **Sem 5th & 6th** |

**2) SE To BE**

| द्वितीय वर्ष (SE) | तृतीय वर्ष (TE) | चतुर्थ वर्ष (BE) |
|---|---|---|
| Passed in OCT-2024 | Minimum 50% Credits in APRIL-2024 | Eligible to Carry on **Sem 7th & 8th** |

...२/–

पुढील वर्षामध्ये प्रवेश घेतल्याचे महाविद्यालयाचे पत्र, प्रवेश शुल्काची पावती, परिपत्रक क्र. ३८/२०२५ प्रमाणे पात्र विद्यार्थ्यांने महाविद्यालयास सादर केलेल्या हमी पत्राची प्रत ही सर्व कागदपत्रे https://examinward.unipune.ac.in/ ExamformOnline/auth/login_college.aspx या लिंकवर Photocopy आणि Revaluation च्या निकालात बदल झाल्यानंतर चार (४) दिवसातच भरण्यात यावी.

एप्रिल/मे २०२५ परीक्षेसाठी अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म मध्ये Photocopy आणि Revaluation च्या निकालानंतर पुढील सत्राचे विषय समाविष्ट करण्याची सुविधा वरीलप्रमाणे सर्व माहिती भरल्यानंतर चार (४) दिवसांसाठीच उपलब्ध करुन देण्यात येईल, याची स्पष्ट कल्पना महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. यामध्ये महाविद्यालयाने विहीत वेळेत माहिती भरली नाही तर त्याला विद्यापीठ परीक्षा विभाग जबाबदार राहणार नाही.

एप्रिल/मे २०२५ परीक्षेतील विद्यार्थ्यांचे Insem, TW, Oral, Practical, Audit Course हे इतर कॅरी ऑन विद्यार्थ्यांप्रमाणेच नियोजित करण्यात यावे. तसेच काही विद्यार्थ्यांचे Photocopy आणि Revaluation मधील निकालात जर बदल झाला नाही तर अशा विद्यार्थ्यांचे Theory, Insem, TW, Oral, Practical, Audit Course चे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ चा कॅरी ऑनचा संबंधित वर्षातील Performance रद्द समजण्यात यावे, महाविद्यालयांनीही याबाबत दक्ष रहावे. तसेच या पत्राचा आशय सर्व संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने निदर्शनास आणावा.

परीक्षा फी परत (Refund) मिळणेबाबत मार्गदर्शक तत्वे संदर्भ क्रमांक परीक्षा/कक्ष—३/विधी—व्यवस्थापन/ ११५२, दिनांक २८/०२/२०११ निर्गमित केलेले असून सदर पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे फेरतपासणी/पुनर्मूल्यांकनांतर्गत पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा अर्ज महाविद्यालय/संस्थेच्या प्रतिनीधीमार्फत एकत्रित करुन परीक्षा विभागाकडे जमा करावेत. त्यानंतर याबाबत आवश्यक पुढील प्रक्रिया करण्यात येईल.

संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये ऑनलाईन माहिती भरण्याकरिता दिनांक ०१/०३/२०२५ ते ०७/०३/२०२५ असा कालावधी देण्यात आलेला आहे. सदर मुदत दिनांक १३/०३/२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी, तसेच एकही पात्र विद्यार्थी कॅरी ऑन संधीपासून वंचित राहणार नाही याची संपूर्ण दक्षता संस्था/महाविद्यालयाने घ्यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website : www.unipune.ac.in.

**Board of Examinations & Evaluation**
**Ganeshkhind, Pune - 411007**
**Phone: 2025621398**
**E-mail:** bee@pun.unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा/एस अॅण्ड टी/1161

दिनांक : 21/10/2024

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हा

**विषय** : परीक्षा शुल्क परत (Refund) मिळणेबाबत...
**संदर्भ** : परीक्षा/कक्ष—३/विधी—व्यवस्थापन/११५२, दिनांक २८/०२/२०११

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे फेरतपासणी/पुनर्मूल्यांकनांअंर्तगत पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा अर्ज महाविद्यालय/संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत एकत्रित करून परीक्षा विभागाकडे जमा करावेत.

कळावे,

आपला,

(डॉ. महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत** : वरीलप्रमाणे.

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२११
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

परीक्षा विभाग
टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४
वेबसाईट: www..unipune.ernet.in
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

संदर्भ : परीक्षा / कक्ष-३ / विधी - व्यवस्थापन / 1152

दि.२८/२/२०११

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- परीक्षा फी परत (Refund) मिळणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरला आहे परंतू फेरतपासणी/पुनर्मूल्यांकन अथवा अन्य काही कारणास्तव संबंधित परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे अथवा अनुत्तीर्ण झाल्याने त्यांनी ती परीक्षा देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अशावेळी वित्त व लेखा विभागाच्या सुचनेनुसार संबंधित विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क परत मिळण्याकरता अर्ज केल्यास तो अर्ज आपल्या महाविद्यालयांमार्फत / संस्थांमार्फत परीक्षा विभागाकडे पाठवावा.

परीक्षा शुल्क परताव्यासाठी महाविद्यालयाने / संस्थेने खालील बाबींची पूर्तता करुनच परतावा अर्ज सादर करावेत.

१. विद्यार्थ्यांचा परीक्षा फी परताव्याचा अर्ज.
२. विद्यार्थ्याने परीक्षा शुल्क भरलेल्या यादीची झेरॉक्स.
३. विद्यार्थ्याने परीक्षा फी भरल्याची मूळ ( Original) पावती.
४. गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.
५. वित्त व लेखा विभागाने परीक्षा शुल्क जमा करुन घेऊन दिलेल्या पावतीची (Receipt) झेरॉक्स प्रत.

वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतरच विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत एकत्रित करुन परीक्षा विभागात जमा करावेत ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
(signature)
परीक्षा नियंत्रक